# बोदवड महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 54 गरजू कुटुंबाना धान्य वाटप करण्यात आले

(20/04/2020) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत तालुक्यातील शेलवड व राजणी या गावातील गरजूंना आधार देण्याचे कार्य महाविद्यालयातर्फे करण्यात आले. Covid-19 च्या झालेल्या लॉक डाऊन मुळे येथील गोरगरीब शेतमजुरी तसेच हात मजुरी करणाऱ्या 54 कुटुंबांना प्रत्येकी 5 किलो गहू व 3 किलो तांदूळाचे वाटप करण्यात आले. स्थानिक विद्यार्थ्यांमार्फत ज्यावेळी या गावातील सद्यस्थिती बद्दल राष्ट्रीय सेवा योजना एककाला कळविण्यात आले त्यानंतर लगेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.चेतनकुमार शर्मा, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी नितेश सावदेकर व महिला कार्यक्रम अधिकारी कंचन दमाडे, यांनी सदर गावातील गरजूंना आधार देण्याचे ठरविले व गावातील स्वयंसेवकांच्या साहाय्याने गरजूंना मदद म्हणून 5 किलो गहू व 3 किलो तांदूळ देण्यात आले. धान्य वाटप करतांना सोशल डीस्टंसिंगचे पालन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी व उपप्राचार्य श्री. डी एस.पाटील यांनी कौतुक केले. प्रियंका, संदीप, अक्षय, दिव्या, जागृती, काजल, स्वप्नील, दीपक आदींनी परिश्रम घेतले.

